CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

नवशक्ति रविवार ▲ १४ जुलै २०२४

नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची माहिती

# पुढील वर्षी नवी मुंबई विमानतळ प्रवासी सेवेत

**ठाणे** : नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ मार्च २०२५ पासून कार्यान्वित होणार असल्याचे शनिवारी नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सांगितले. मोहोळ यांनी नागरी उड्डाण मंत्री के. आर. नायडू यांच्यासमवेत विमानतळ परिसराची पाहणी केली आणि कामाच्या प्रगतीचा आढावा घेतला.

कामाच्या प्रगतीचा आढावा पाहता विमानतळ मार्च २०२५ मध्ये कार्यान्वित होईल. त्यामुळे शेजारच्या मुंबई, ठाणे, पुणे, कल्याण आणि पश्चिम महाराष्ट्राशी संपर्कता वाढेल, हे विमानतळ आंतरराष्ट्रीय दर्जाचे असून दरवर्षी



जवळपास २० दशलक्ष प्रवाशांची ये-जा होईल, असेही मोहोळ यांनी सांगितले.

या विमानतळाला शेकापचे दिवंगत ज्येष्ठ नेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याबाबत मोहोळ यांनी सकारात्मकता दर्शविली. प्रकल्पबाधितांच्या नुकसानभरपाईचा प्रश्न व्यवस्थापनाशी चर्चा करून सोडविला जाईल. ज्यांनी विमानतळासाठी जागा दिली त्यांना विस्थापित होऊ दिले जाणार नाही. राज्यातील विकासकामांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा नेहमीच पाठिंबा आहे, असेही नागरी उड्डाण राज्यमंत्री म्हणाले.

विधान परिषद निकालाबाबत मोहोळ म्हणाले की, काँग्रेसने अंतर्गत आव्हानांबाबत आत्मचिंतन करावे. महायुतीच्या कामगिरीची त्यांनी यावेळी स्तुती केली.



CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

पुण्य नगरी मुंबई विभाग । रविवार, १४ जुलै २०२४ । मुंबई

# नवी मुंबई विमानतळाचा पहिला टप्पा मार्च २०२५ पर्यंत खुला करणार

## नागरी हवाई वाहतूक मंत्री राम मोहन नायडू आणि राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची माहिती

**। मुंबई** : नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम सध्या वेगाने सुरू आहे. या प्रकल्पातील पहिल्या टप्प्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. या विमानतळाचा पहिला टप्पा मार्च २०२५ पर्यंत प्रवाशांसाठी खुला करण्याचे नियोजन आहे, अशी माहिती केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी या विमानतळाच्या पाहणीदरम्यान दिली.

नागरी हवाई वाहतूक मंत्री राम मोहन नायडू, राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी अधिकाऱ्यांकडून विमानतळाच्या निर्माण कार्याचा आढावा घेतला. या वेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचीही उपस्थिती होती. या वेळी या संपूर्ण प्रकल्पाच्या प्रतिकृती आणि सादरीकरणाच्या माध्यमातून अधिकाऱ्यांकडून माहिती देण्यात आली. त्यानंतर सर्वांनी या प्रकल्पातील पूर्णत्वाकडे चाललेल्या पहिल्या टप्प्यातील टर्मिनलची पाहणी केली. सिडकोचे उपाध्यक्ष विजय सिंघल, विमानतळ प्राधिकरणाचे अध्यक्ष संजीव कुमार, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे अधिकारी, नागरी उड्डाण मंत्रालयाचे अधिकारी या वेळी उपस्थित होते.

याप्रसंगी केंद्रीय मंत्री मोहोळ यांनी माध्यमांशी संवाद साधत माहिती दिली. मोहोळ म्हणाले की, नवी मुंबई विमानतळ पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाल्यास दर वर्षी ९ कोटी प्रवाशांना ये-जा करता येईल. यातील पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाल्यावर या टर्मिनलवरून वर्षाला २ कोटी प्रवासी ये-जा करू शकतील. इतक्या प्रचंड क्षमतेच्या जागतिक दर्जाचे हे विमानतळ संपूर्ण परिसराचा चेहरा-मोहरा बदलवून टाकणारा आहे.

नवी मुंबईचे हे विमानतळ भारतातील अग्रणी मल्टीमॉडल ॲव्हिएशन हब म्हणून विकसित होत आहे. हे विमानतळ मुंबईसह कल्याण, ठाणे, पुणे आणि पश्चिम महाराष्ट्रातील हवाई प्रवास करणाऱ्यांसाठी वरदान ठरणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून आकाराला येत असलेल्या गतिशक्ती मिशनचे हे विमानतळ सर्वात चांगले उदाहरण आहे. या विमानतळावरून मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे, महामार्ग, रेल्वे, उपनगरीय रेल्वे, मेट्रो आणि सागरी मार्ग अशी सर्वप्रकारची कनेक्टिव्हिटी प्रवाशांना मिळणार आहे, असेही मोहोळ म्हणाले.



CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

लोकमत मुंबई, रविवार, दि. १४ जुलै २०२४

# नवी मुंबईतून मार्चमध्ये 'टेकऑफ'

## राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ; दि. बा. पाटलांच्या नावास प्रतिसाद

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी मुंबई :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हे मल्टिमॉडेल कनेक्टिव्हिटी असणारे देशातील पहिले विमानतळ असेल. या विमानतळावरून मार्च २०२५ मध्ये पहिल्या विमानाचे टेकऑफ होईल, असा विश्वास नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केला आहे. केंद्रीय नागरी विमान वाहतूकमंत्री किंजरापू राममोहन नायडू यांच्यासोबत मोहोळ यांनी शनिवारी विमानतळ प्रकल्पाला भेट देऊन कामाचा आढावा घेतला. विमानतळाला स्व. दि. बा. पाटील यांचे नाव देण्याबाबत त्यांनी सकारात्मक भूमिका व्यक्त केली आहे.

विमानतळ प्रकल्पासाठी वेगवेगळ्या संस्था काम करीत असून तिची जबाबदारी आखून दिली आहे. त्यादृष्टीने काम सुरू आहे. रखडलेल्या या प्रकल्पाच्या कामाने वेग घेतला आहे. त्याचा पहिला टप्पा मार्च २०२५ मध्ये पूर्ण करण्याचा निर्धार केंद्र शासनाने केला आहे.




### विमानतळाची वैशिष्ट्ये

नवी मुंबई विमानतळ पाच टप्प्यांत उभारले जाणार आहे. टप्पा क्रमांक १ आणि २ एकत्रित पूर्ण केले जाणार आहे. यात एक टर्मिनल आणि एक रन वे असणार आहे. ३१ मार्च २०२५ पर्यंत हा टप्पा व्यावसायिक वापरासाठी खुला होईल. याअंतर्गत २ कोटी प्रवासी प्रवास करू शकतील, असा अंदाज आहे. टप्पा क्रमांक ३, ४ आणि ५ मध्ये तीन टर्मिनल आणि एक रन वे असणार आहे. या टप्प्यानंतर वार्षिक ९ कोटी प्रवासी वाहतूक होईल, असा अंदाज आहे.

### विविध संस्थांना दिलीय डेडलाईन

- विमानतळ प्रकल्पासाठी वेगवेगळ्या संस्था काम करीत असून प्रत्येकाला तिची जबाबदारी आणि डेडलाइन आखून दिली आहे. त्यादृष्टीने काम सुरु आहे.
- **सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी विमानतळ प्रकल्पाच्या कामावर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. तीन महिन्यांत त्यांनी जवळपास आठ ते दहा वेळा या प्रकल्पाला भेट देऊन कामाची पाहणी केली आहे.**
- शनिवारी केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्र्यांच्या भेटीप्रसंगी विजय सिंघल यांच्यासह सहव्यवस्थापकीय संचालक शांतनू गोयल, खासदार श्रीकांत शिंदे, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ लिमिटेडचे जीत अदानी, मुख्य कार्यकारी अधिकारी बीव्हीजेके शर्मा उपस्थित होते.

CIDCO
WE MAKE CITIES
NEWS

मुंबई । रविवार, १४ जुलै २०२४ । महाराष्ट्र टाइम्स

# दरडीपासून दक्षतेचा 'इशारा'

कुणाल लोंढे, पनवेल

## डोंगराला सुरक्षा कुंपण घालण्याचे काम सुरू

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे विस्थापित झालेल्या वरचे ओवळे गावाशेजारील डोंगरातून कोसळणाऱ्या दगडांपासून नागरिक सुरक्षित रहावेत, यासाठी डोंगराला सुरक्षा कुंपण घालण्याचे काम सुरू आहे. गतवर्षी डोंगरातून दगड कोसळण्याची घटना घडल्यानंतर स्थानिकांच्या मागणीनुसार सिडकोने डोंगराला केवळ सुरक्षा जाळी न लावता मोबाइलवर मॉनिटरिंग आणि अर्ली वॉर्निंग सिस्टमच्या माध्यमातून संदेश मिळणारी यंत्रणा बसविण्याचे काम प्रगतिपथावर आहे.

वरचे ओवळे गावातील विस्थापितांना महात्मा फुले कॉलेजच्या बाजूला वसविण्यात आले आहे. विमानतळबाधितांना विकसित भूखंड दिल्यानंतर इथे इमारती उभ्या राहिल्या आहेत. अनेक कुटुंबे गाव सोडल्यानंतर इथे राहू लागली आहेत. डोंगराच्या बाजूला अगदी चिटकून रस्ता आणि रस्त्याच्या बाजूला इमारती अशी परिस्थिती इथे आहे. डोंगराला लागून इमारती उभ्या राहिल्यामुळे डोंगर खचण्याची भीती नागरिकांना वाटत आहे. वसाहत वसल्यानंतर अवघ्या दोन वर्षांत डोंगरावरून दगड कोसळण्याच्या घटना घडल्या. नागरिकांनी केलेल्या मागणीनंतर सिडको प्रशासनाने सुमारे २२ फूट उंच आणि ६०० मीटर रुंदीच्या डोंगराला लोखंडी जाळी लावून सुरक्षित करण्याचे काम सुरू केले आहे. २२ कोटी रुपयांचा खर्च करून सुरू असलेले काम निम्म्यापेक्षा जास्त पूर्ण झाले आहे. सिडकोने हे काम करताना अत्याधुनिक पद्धतीचा वापर केला असून जाळीत लावलेल्या सिस्टममुळे डोंगरात चालेलल्या हालचालींवरही नजर ठेवता येणार आहे, असा दावा हे काम करणाऱ्या 'गरवारे टेक्निकल फायबर्स' या कंपनीने केला आहे.

रुळावर कोसळणाऱ्या दरडींपासून सावधान होण्यासाठी या तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. सिडकोने पहिल्यांदाच हा प्रयोग केल्याचा दावा आहे.

### मोबाइलवर अलर्ट

डोंगरात हालचाली होऊ लागल्यास संबंधित व्यक्तींच्या थेट मोबाइलमध्ये अलर्ट संदेश पोहोचणार आहे. जाळीमुळे किरकोळ दगड खाली पडणार नाहीत. अधिक माहितीसाठी सिडकोचे अभियंता चैतन्य गरड यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. परंतु होऊ शकला नाही.



@Cidco Ltd @cidco_Ltd @cidco_Ltd @CIDCO Ltd. cidco.maharashtra.gov.in

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

लोकमत Hello Navi Mumbai
Page No. 1 Jul 14, 2024

### पारगाव हिलवर संभाव्य आपत्तीची आगाऊ सूचना देणारी यंत्रणा

# दुर्घटनेआधी 'एसएमएस' भूस्खलनाची देणार माहिती

**वैभव गायकर**

लोकमत न्यूज नेटवर्क

**पनवेल :** अलीकडे अतिवृष्टीमुळे भूस्खलनाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. यामुळे वित्तहानी तर होतेच अनेक निष्पापांना आपले जीव गमवावे लागत आहेत. हे टाळण्यासाठी नवी मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळ परिसरात पुष्पकनोडला लागून असलेल्या पारगाव हिलवर सिडको मॉनिटरिंग अँड अर्ली वॉर्निंग डिटेन्शन सिस्टिम अर्थात संभाव्य आपत्तीची आगाऊ सूचना देणारी यंत्रणा बसवीत येत आहे. यामुळे या परिसरतील डोंगरावर काही हालचाली झाल्यास अथवा भूस्खलन होणार असल्यास त्याची माहिती या यंत्रणेद्वारे अगोदरच समजणार आहे.

५०० चौरस मीटरच्या जागेत उभारल्या जाणाऱ्या जागेत यंत्रणेत लोखंडी जाळीदेखील लावण्यात येणार आहे. २३ करोड खर्चून उभारल्या जाणारा हा प्रकल्प पुणे स्थित गरवारे टेक्निकल हायबर्स लिमिटेड या कंपनीमार्फत सिडको उभारत आहेत. पुष्पकनोडमध्ये नवी मुंबई परिसरातील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन केले आहे. येथे प्रकल्पग्रस्तांना भूखंडदेखील देऊ केले आहेत.

भविष्यात या ठिकाणची लोकवस्ती झपाट्याने वाढणार असल्याने सिडको प्रशासनामार्फत सावधानता बाळगण्यासाठी ही यंत्रणा बसविण्यात येत आहे. या परिसरात यापूर्वी अनेकवेळा भूस्खलन झाले आहे त्यात जीवितहानी झाली नसली तरी भविष्यात याबाबत उपाययोजना राबविणे काळाची गरज असल्याने सिडकोने हा निर्णय घेतला आहे.



करंजाडे नोडमधील एसी कॉलेज परिसर सेक्टर एक येथे दरड पडण्याची शक्यता असल्यामुळे सिडकोतर्फे येथे जाळी बसवण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. (छाया : भालचंद्र जुमलेदार)

अर्ली व्हॉर्निंग डिटेन्शन सिस्टिमद्वारे पारगाव हिल परिसरात भूस्खलन होणार असल्यास त्याची आगाऊ माहिती मिळणार आहे. पुढील मोठी घटना टाळण्यासाठी या यंत्रणेचा उपयोग होणार असून ५०० मीटर जागेत ही लोखंडी तारेची जाळी उभारण्याचे काम सुरु आहे.

- चैतन्य घरत (सहायक कार्यकारी अभियंता, एअरपोर्ट-२, सिडको)

## दुर्घटना टाळण्यास होणार मदत

- पनवेल परिसरात मोठ्या प्रमाणात सह्याद्री पर्वतरांगांचे जाळे पसरले आहे. पनवेल ग्रामीण, खारघर हिल, पुष्पकनोड आदी ठिकाणी या पर्वत रांगा पसरलेल्या आहेत. दरवर्षी पनवेलमध्ये कुठेना कुठे भूस्खलनाचे प्रकार घडत असतात.
- **सिडकोने बसविलेली ही यंत्रणा यशस्वी ठरल्यास इतर ठिकाणी ती बसवून भूस्खलनाद्वारे होणाऱ्या दुर्दैवी घटना टाळण्यास मदत होणार आहे.**

## अशी मिळणार माहिती

१ या यंत्रणेद्वारे डोंगरातील लहानसहान हालचालींची माहिती त्वरित 'एसएमएस'द्वारे मिळणार आहे.

२ **याकरिता या सिस्टिममध्ये स्थानिक लोकप्रतिनिधी, सिडकोचे नोडल अधिकारी अथवा इतर वरिष्ठ अधिकारी, तसेच संबंधित कंपनीच्या प्रतिनिधीला मिळणार आहे. यामुळे संबंधित सतर्क होऊन पुढील घटना टाळण्याच्या दृष्टीने हालचाली करतील.**

३ पूर्वकल्पना मिळणार असल्याने या परिसरात त्वरित उपाययोजना राबवून पुढील वित्त आणि जीवितहानी टळणार आहे.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

SUNDAY TIMES OF INDIA, MUMBAI
JULY 14, 2024

# Navi Mum airport to be operational by Mar '25: Mohol

**Navi Mumbai:** Minister of State for Civil Aviation Murlidhar Mohol on Saturday said the Navi Mumbai International Airport is slated to commence operations in March 2025. Union Civil Aviation Minister Kinjarapu Rammohan Naidu and Mohol visited the airport site and reviewed the progress of the ongoing work.

"Going by the progress of the work, the airport will be operational in March next year. It will enhance connectivity with neighbouring Mumbai, Pune, Thane, Kalyan, and western Maharashtra," Mohol said, highlighting its international standards and anticipated annual footfall of nearly 20 million passengers. He expressed positivity towards naming the airport after late PWP leader DB Patil. He also assured that issues about compensation for project-affected persons (PAP) would be resolved through discussions with management.

"We are committed to ensuring that people who have contributed land for the airport project are not displaced," the minister clarified, emphasising the government's awareness of project-related issues and compensations. He underscored Prime Minister Modi's ongoing support for development initiatives in Maharashtra.

Talking about the results of the Maharashtra council elections, Mohol lauded the Mahayuti alliance's performance and urged the Congress to introspect on its internal challenges.

The ruling Mahayuti alliance on Friday won all the nine seats it contested in the biennial elections to 11 legislative council seats, while the opposition Maha Vikas Aghadi faced a setback as a candidate backed by NCP (SP) lost. PTI

@Cidco Ltd @cidco_Ltd @cidco_Ltd @CIDCO Ltd. cidco.maharashtra.gov.in

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

नवभारत मुंबई, रविवार 14 जुलाई 2024

### उड्डयन राज्य मंत्री मोहोल ने दिया आश्वासन

# 2025 तक शुरू हो जाएगा नवी मुंबई का हवाई अड्डा



■ **नवी मुंबई, (सं).** नागरिक केंद्रीय राज्य मंत्री मुरलीधर मोहोल ने विश्वास व्यक्त करते हुए कहा कि नवी मुंबई अंतर्राष्ट्रीय हवाई अड्डा मार्च 2025 में चालू हो जाएगा. मोहोल नवी मुंबई में बन रहे अंतर्राष्ट्रीय हवाई अड्डे का निरीक्षण करने के लिए नवी मुंबई आए थे. मोहोल ने हवाई अड्डे के कामकाज का निरीक्षण किया. हवाई अड्डे का निरीक्षण करने के लिए दोनों मंत्रियों का स्वागत सिडको के प्रबंध निदेशक विजय सिंघल द्वारा किया गया. साथ ही सिंघल ने हवाई के चल रहे कामकाज के बारे में जानकारी उपलब्ध कराई.

निरीक्षण करते समय विश्वास व्यक्त करते हुए मोहोल ने कहा कि काम की प्रगति को देखते हुए ऐसा लग रहा है कि हवाई अड्डा अगले साल मार्च में चालू हो जाएगा. इससे पड़ोसी मुंबई, पुणे, ठाणे, कल्याण और पश्चिमी महाराष्ट्र के साथ संपर्क बढ़ेगा. उन्होंने हवाई अड्डे के अंतरराष्ट्रीय मानकों और लगभग 20 मिलियन यात्रियों की अनुमानित वार्षिक संख्या पर प्रकाश डाला.

### प्रभावित व्यक्तियों को मिलेगा उचित मुआवजा

मोहोल ने कहा कि हवाई अड्डे का नाम दिवंगत नेता डीबी पाटिल के नाम पर रखने के प्रति सकारात्मकता व्यक्त की. उन्होंने यह भी आश्वासन दिया कि परियोजना से प्रभावित व्यक्तियों के लिए मुआवजे के मुद्दों को प्रबंधन के साथ चर्चा के माध्यम से हल किया जाएगा. मंत्री ने स्पष्ट करते हुए कहा कि हम यह सुनिश्चित करने के लिए प्रतिबद्ध हैं कि हवाई अड्डा परियोजना के लिए भूमि देने वाले लोग विस्थापित न हों.




Hindustan Times
MUMBAI
SUNDAY
JULY 14, 2024

# NAVI MUMBAI AIRPORT TO BE OPERATIONAL BY MARCH 2025

**G Mohiuddin Jeddy**

htmumbai@hindustantimes.com

**NAVI MUMBAI:** The Minister of State for Civil Aviation and Cooperation, Murlidhar Mohol, on Saturday said the under-construction Navi Mumbai International Airport (NMIA) will be operational by March 2025.

The announcement came after an inspection of the airport site by union civil aviation minister Kinjarapu Rammohan Naidu and Mohol along with Kalyan MP Shrikant Shinde, CIDCO and NMIA officials. "We reviewed the status of the work and were given a presentation of the progress of the work and the timeline. The project is proceeding at a good pace and hence I am confident that the airport will be operational by March 2025," said Mohol. "All types of connectivity is provided for the airport that will be useful for regions like Mumbai, Pune, Thane, Kalyan and western Maharashtra. A lot of things are being planned for the airport, which will have 4 terminals with a capacity of 2 crore passengers."

Speaking on the demand to name the airport after PAP leader D B Patil, he said, "There have been several protests to name the airport after the revered leader of this region. We are all looking at it positively. There is no reason to doubt the intentions." Assuring the PAPs who have raised their demands for jobs and compensation and resorted to Jal Samadhi protest on Friday, Mohol said, "I and Minister Naidu will speak to the administration on the demands and ensure that the PAPs get justice."

आपलं महानगर रविवार १४ जुलै २०२४

# मार्च २०२५ मध्ये नवी मुंबई विमानतळावरून पहिले उड्डाण

## केंद्रीय व राज्यमंत्र्यांकडून कामाचा आढावा ▌ दि.बा.पाटील यांच्या नावासाठी सरकार प्रयत्नशील-मोहोळ

प्रतिनिधी । आपलं महानगर वृत्तसेवा

नवी मुंबई । मुंबई, ठाणे, पुणे आणि मुंबई उपनगर परिसराला दळणवळणाने महत्वपूर्ण असलेला नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प हा राष्ट्रीय दृष्टीकोनातून अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प आहे. या प्रकल्पाची उभारणी सध्या सुरु असून या विमानतळाचे काम वेळेत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट केंद्र व राज्य सरकारने डोळ्यासमोर ठेवले आहे. या विमानतळावरून मार्च २०२५ अखेरीस पहिल्या विमानाचे उड्डाण होईल, असा विश्वास केंद्रीय मंत्री किंजरापू राम मोहन नायडू यांनी व्यक्त केला. तर या विमानतळाला प्रकल्पग्रस्तांचे नेते स्वर्गीय दि.बा. पाटील यांचे नाव देण्याकरिता स्थानिक भूमिपुत्रांचे अनेक मोर्चे, आंदोलने झाली. दिबांच्या नावासाठी सकारात्मक निर्णय घेण्यासाठी राज्य व केंद्र सरकार प्रयत्नशील असल्याची ग्वाही राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिली.



केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री किंजरापू राम मोहन नायडू, राज्यमंत्री, नागरी विमान वाहतूक व सहकार विभागाचे मुरलीधर मोहोळ आणि खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांनी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पस्थळास भेट देऊन विमानतळाच्या विकासाच्या प्रगतीचा आढावा घेतला. सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी केंद्रीय मंत्र्यांचे विमानतळ प्रकल्पस्थळी स्वागत केले.मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी नवी मुंबई विमानतळ प्रकल्पासाठी ज्या स्थानिकांनी आपल्या जमिनी दिल्या आहेत. त्यांना बेघर करणार नसल्याचे स्पष्ट केले. प्रकल्पाच्या वेगवान पूर्ततेसाठी योग्य त्या सूचना सिडको व एनएमआयएएलच्या अधिकाऱ्यांना दिल्या.

यावेळी सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, सहव्यवस्थापकीय संचालक शान्तनु गोयल, मुख्य महाव्यवस्थापक (परिवहन आणि विमानतळ) गीता पिल्लई, मुख्य अभियंता (नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ) शीला करुणाकरन, पूर्ण वेळ संचालक, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ लिमिटेडचे जीत अदानी, मुख्य कार्यकारी अधिकारी, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ कॅप्टन. बीव्हीजेके शर्मा यांच्या समवेत सिडकोचे आणि एनएमआयएएलचे अधिकारी उपस्थित होते.